**Dy. Commissioner of Police,**
**Zone-6, Chembur, Mumbai -71**
**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६,**
**चेंबूर (पूर्व), मुंबई- ७१**
**Email Id - dcpzone6-mum@mahapolice.gov.in**
**Date 31/12/2021**

---

## प्रेस नोट - १४

### धोकादायक व्यक्ती व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधक सराईत गुंड अजय मारीमुत्तु पेरिस्वामी उर्फ चोर आण्णा स्थानबध्द

फिर्यादी श्रीमती फातिमा बाबु शेख, वय ३७ वर्षे या दि. ०९/०८/२०२१ रोजी ०३:३० वा भारतनगर ,म्हाडा कॉलनी, वाशीनाका,चेंबुर, मुंबई ७४ या त्यांच्या चायनिज पदार्थ विक्री व्यवसायाच्या ठिकाणी साफ सफाई करीत असताना इसम नामे अजय मारीमुत्तु पेरिस्वामी उर्फ चोर आण्णा उर्फ चेंबूर आण्णा, याने फिर्यादी यांना दारु पिण्यासाठी एक हजार रुपये पैशांची मागणी करुन फिर्यादी यांनी पैसे देण्याचा नकार दिल्याने त्याने खिशातुन चाकु काढून चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीना शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन जबरदस्तीने फिर्यादीच्या चायनिज व्यवसायाच्या गल्यातुन साडे चार हजार रुपये काढुन घेवुन त्यांचा मोबाईल हिसकावुन घेतला म्हणून गु.र.क्र. ५३०/२०२१, कलम ३९२, ३२३, ५०४ भा.दं.वि. सह कलम ३७(१)(अ),१३५ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासात असे निष्पन झाले की, इसम अजय मारीमुत्तु पेरिस्वामी उर्फ आण्णा उर्फ चोर आण्णा उर्फ चेंबूर आण्णा, वय २५ वर्षे, रा.ठी.नया सवेरा सोसायटी, बि.नं. ३, रूम नं. २१२, रॉकलाईन म्हाडा वसाहत चेंबुर मुंबई ७४ हा आर. सी. एफ. पोलीस ठाणे हददीत दहशत निर्माण करून त्याचे साथीदारांसह चॉपर, चाकु इत्यादी प्राणघातक हत्यारे जवळ बाळगुन मारामारी करणे, जबरी चोरी करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, घरफोडी करणे, विनयभंग करणे, असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करून त्याची दहशत पसरवून सार्वजनिक शांतता व सुरक्षितेतसाठी धोकादायक व्यक्ती झाला असुन त्याचे विरूध्द आर. सी. एफ. पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे नोंद आहेत.

नुमद इसमा विरूध्द सन २०१५ पासुन गुन्हे नोंद असुन त्याच्याविरूध्द यापुर्वी फौजदारी दंड प्रकीया संहीत व महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करून देखील त्याच्या वर्तणुकीत सुधारणा झाली नसल्याचे निदर्शनास आल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आर.सी.एफ पोलीस ठाणे यांनी इसम नामे अजय मारीमुत्तु पेरिस्वामी उर्फ आण्णा उर्फ चोर आण्णा उर्फ चेंबूर आण्णा, वय २५ वर्षे, याचे विरूध्द दाखल गुन्हयाचे अनुषंगाने एम.पी.डी.ए.कायदा १९८१ अन्वये स्थानबध्द कार्यवाहीसाठी पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-६, मुंबई यांचे मार्फतीने मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिनांक ३१/१२/२०२१ रोजी इसम अजय मारीमुत्तु पेरिस्वामी उर्फ आण्णा उर्फ चोर आण्णा उर्फ चेंबूर आण्णा, वय २५ वर्षे, यास स्थानबध्द करण्याचे आदेश पारीत करण्यात आले आहेत.

यावर्षी जानेवारी २०२१ पासून परिमंडळ ६ अंतर्गत "महाराष्ट्र झोपडपट्टीगुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ति, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस), वाळु तस्कर व अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (**M.P.D.A**)" १९८१ अन्वये केलेली ही चौथी कारवाई असून यापूर्वी ट्रॉम्बे पोलीस ठाणे हद्दीतील नौशाद उर्फ नझीर उर्फ नासीर सलीम खान, देवनार पोलीस ठाणे हद्दीतील सिध्दांत शशिकांत वाकोडे व टिळकनगर पोलीस ठाणे हद्दीतील रोहीत गजानन धांदे याचेवर एम. पी. डी. ए. कायदयाखाली कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारे व वारंवार गुन्हे करून सार्वजनिक सुव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांची गय केली जाणार नसुन त्यांच्या विरुद्ध भविष्यात देखील अशा प्रकारची कडक कार्यवाही करण्यात येईल.

००००००